# प्रेसनोट

## सरदार वल्लभाई पटेल यांची जंयती व स्वर्गीय इंदीरा गांधी यांची पुण्यतिथी निमीत्ताने "राष्ट्रीय एकता दिवस" तसेच " राष्ट्रीय संकल्प दिवस" निमीत्त पोलीस व इतर खात्याचे अधिकारी व कर्मचाऱ्यांचा राष्ट्रध्वजासह रुट मार्च परेड!

जा.क्र. ७४१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३१/१०/२०१७

भंडारा:– दिनांक ३१ ऑक्टोबर २०१७ मंगळवार रोजी लोह पुरुष वल्लभभाई पटेल यांची जयंती तसेच स्वर्गीय इंदीरा गांधी यांची पुण्यतिथी निमीताने "राष्ट्रीय एकता दिवस" तसेच" राष्ट्रीय संकल्प दिवस" या अनुषंगाने पोलीस मुख्यालय येथील पोलीस कवायत मैदान येथे मा. विनीता साहु, यांच्या अध्यक्षतेखाली मा. अपर पोलीस अधिक्षक रश्मि नांदेडकर, पोलीस उपअधीक्षक (गृह) एस. व्ही कुलकर्णी कोब्रा बॅटालियनचे असिन्टंड कमांडर सौरभ सिंग यांनी लोह पुरुष वल्लभभाई पटेल जयंती तसेच स्व. इंदीरा गांधी यांची पुण्यतिथी निमीत्ताने त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन जयंती व पुण्यतिथी साजरी करण्यात आली. त्यावेळी जीवनातील कर्तुत्व व कार्यप्रणालीबाबत माहीती देवुन सर्वानी राष्ट्रीय एकात्मता अखंड राखण्याची शपथ घेण्यात आली.

केन्द्रीय सर्तकता आयोग यांचे सुचनेनुसार महाराष्ट्र शासन दिनांक ३१ आक्टोबर २०१७ ते ४ नोव्हेबर २०१७ या कालावधी "दक्षता जनजागृती सप्ताह" देखील साजरा करण्यात येत आहे. सदर कार्यक्रमा दरम्यान पोलीस व ईतर विभागानी राष्ट्रध्वजासह रुट मार्च परेड संचालन केले.

याप्रसंगी भंडारा जिल्हयाचे उपविभागिय पोलीस अधिकारी जोगदंड साहेब, उपविभागिय पोलीस अधिकारी विक्रम साळी, उपविभागिय पोलीस अधिकारी पवनी टिक्कस अधिकारी राखीव पोलीस निरीक्षक वर्मा, पोलीस उपनिरीक्षक प्रधान, एकुण २९ अधिकारी व ३०५ कर्मचारी, १२६ होमगार्ड त्याचप्रमाणे क्रोबा बटालियन २ अधिकारी, १४ कर्मचारी पोलीस बॉईज संघटना, हे हजर होते. सदर संचालनाचा मार्ग मार्ग त्रिमुर्ती चौक ते मुस्लीम लायबरी चौक ते अन्नाभाऊ साठे चौक ते गांधी चौक मेन रोड, पोष्ट आफिस चौक ते त्रिमुर्ती चौक ते पोलीस मुख्यालय कवायत मैदानात संचालनाची साकता झाली.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता आग्रेषित.